# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crimes**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **15/05/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मंगरूळपीर हद्दीतील ग्राम शेलूबाजार येथील सासूसह मेव्हणीची दुहेरी हत्या करणाऱ्या आरोपीस पोलिसांनी शिताफीने तात्काळ अटक केली.

पुण्य नगरी

पुण्य नगरी SMART वाशीम

नागपूर, शनिवार, १४ मे २०२२

## शेलुबाजार येथे दुहेरी हत्याकांडाचा थरार

### जावयाने केली सासू व मेहुणीची हत्त्या; आरोपी गजाआड

मंगरूळपीर, दि.१३ (प्रतिनिधी)

**संपतीच्या वादातून जावयाने सासू व मेव्हणीवर धारदार शस्त्राने वार करुन हत्या केल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील शेलुबाजार येथे १३ मे रोजी सकाळी घडली. या हत्याकांडानंतर पसार होण्याच्या बेतात असलेला आरोपी जावाई सचिन धर्मराज थोरात (४२) याला पोलिसांनी गजाआड केले. निर्मलाबाई भिकाजी पवार (६५) व विजया बबनराव गुंजावळे असे या घटनेतील मृत मायलेकीचे नाव आहे. या थरारक दुहेरी हत्याकांडामुळे शेलुबाजारसह परिसरात दहशतीचे वातावरण आहे.**



प्राप्त माहितीनुसार, या घटनेतील आरोपी सचिन थोरात (४२) हा कामानिमित्त पुणे येथे वास्तव्यास आहे. तर परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे वास्तव्यास असलेली विजया गुंजावळे ही निर्मलाबाई पवार यांची मोठी मुलगी काही दिवसांपूर्वी माहेरी आली होती. दरम्यान, घटनेच्या दिवशी दोघी मायलेकी घरात असताना पुण्यावरुन शेलुबाजार येथे आलेल्या सचिन थोरात हा पवार यांच्याकडे आला. यावेळी त्याने वाद घालून सोबत आणलेल्या धारदार कोयत्याने दोघी मायलेकीवर सपासप वार केले. या हल्ल्यात दोघी मायलेकीचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच एपीआय मंजुषा मोरे, एएसआय अनिरुद्ध भगत, हेकॉ ज्ञानेश्वर राठोड, पोकॉ संदिप खडसे, गोपाल कव्हर, अंकुश मस्के यांनी घटनास्थळ गाठत पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हलविले. या दुहेरी हत्याकांडानंतर पळून जाण्याच्या बेतात असलेल्या आरोपीला पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेत गजाआड केले. आरोपीवर कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, ही घटना संपतीच्या वादातून घडल्याचा अंदाज वर्तविण्यात येत असून घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे, ठाणेदार सुनील हुड यांचे मार्गदर्शनात एपीआय मंजुषा मोरे करीत आहेत.